MHBI170000132026

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४/२०२६</u>

<u>नि.क्र.१ वरील आदेश</u>

(दिनांक १२/०३/२०२६)

१. **शालु अर्जुन सौवणे,**

२. **अशोक अर्जुन सौवणे,**

३. **ज्ञानेश्वर अर्जुन सौवणे,**

४. **अनिता बाळनाथ फसले,** **---- अर्जदार**

**– विरुध्द –**

**कोणीही नाही.** **---- गैरअर्जदार**

**१.** अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराच्या अभिकथनाप्रमाणे अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील मयत **अर्जुन रामकिसन सौवणे** यांचे दिनांक २९.०३.२०२५ रोजी नालासोपारा, ता. वसई, जि. पालघर येथे निधन झालेले असून ते मौजे तिगाव, ता. वडवणी, जि. बीड येथील रहिवासी होते. मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांच्या आई–वडीलांचे देखील पुर्वीच निधन झाले आहे. त्यामुळे, मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच त्यांचे एकमेव वारस असून यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

**३.** मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांचे मृत्युपश्चात अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामाकरीता वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**४.** अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार तर्फे विधीज्ञ **एस. ए. कदम** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत अर्जाचे निर्गतीकरीता

खालीलप्रमाणे मुद्दा उपस्थित झाल्यामुळे त्यांच्या कारणामीमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमुद करत आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ ते ४ हे मागणी केल्याप्रमाणे मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांचा वारस दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | **होकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत –**

५. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्ठी देण्यासाठी खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

| अ. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची व्हेरिफाईड प्रत | **नि.क्र. १२** |
| २. | अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधार कार्डांच्या व्हेरीफाईड प्रती | **नि.क्र.१३ ते १६** |

६. अर्जदारांच्या मागणीप्रमाणे दिनांक २१.०१.२०२६ रोजी दैनिक "संकेत" या आवृत्ती मधील जाहिर नोटीस **(नि.क्र.१०)** काढण्यात आली. या न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेला जाहिरनामा **(नि.क्र.७)** येथे दाखल आहे. या जाहिरनाम्याच्या व जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार हे मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांचे वारस नाहीत अशी तक्रार कुणीही आजतागायत उपस्थित केलेली नाही.

७. अर्जदार क्र.१ यांनी याकामी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **(नि.क्र.११)** दाखल केलेले आहे. सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने व दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहे. थोडक्यात, अर्जदार यांच्या या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांचे

कायदेशिर वारस असल्याची बाब वादातीत नाही. अर्जदार क्र.१ पत्नी आणि अर्जदार क्र.२ ते ४ अपत्ये या नात्याने मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांचे वारस ठरतात. अशाप्रकारे अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांचे वारस आहेत असा वारस दाखला (Heirship Certificate) त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर प्रदान करणेत यावा.

३. अर्जदारांनी सिव्हील मॅन्युअलचे परिच्छेद ३१२ च्या तरतुदीप्रमाणे मयत अर्जुन रामकिसन सौवणे यांचे नावावरील सर्व मालमत्तांची यादी दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.03.16 12:01:22 +0530

**दिनांक – १२/०३/२०२६**

**(विष्णु द. गिते)**
**दिवाणी न्यायाधिश क.स्तर, वडवणी,**
**जि. बीड.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>वडवणी, जि. बीड. |
| लघुलेखकाचे नाव | :- | राजेश आर. कुलकर्णी |
| घोषित दिनांक | :- | १२/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १२/०३/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १२/०३/२०२६ |